



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १४ जानेवारी २०२५ | अंक ३६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# संतोष देशमुख हत्याप्रकरणात मोठं ट्विस्ट; नवीन एसआयटीची स्थापना, कारण काय?

Special Investigation Team



## मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक

संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आठ आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे, मात्र या प्रकरणात आरोप होऊन देखील वाल्मिक कराड यांच्यावर मोक्का न लावण्यात आल्यानं आज मस्साजोगचे ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले, पाण्याच्या टाकीवर चढून ग्रामस्थांनी आंदोलन केलं. या आंदोलनामध्ये संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख देखील सहभागी झाले होते. वाल्मिक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली. या आंदोलनात मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील देखील सहभागी झाले होते, यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली, वाल्मिक कराडवर मोक्का का लावला जात नाही असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनं खळबळ उडाली आहे. राज्यात चांगलंच वातावरण तापलं आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे, सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून, एसआयटीची स्थापना देखील करण्यात आली होती. मात्र आता या प्रकरणात पुन्हा एकदा नव्यान एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. नव्या एसआयटीमध्ये अनिल गुजर. विजयसिंग जोनवाल, महेश विघ्ने, आनंद शंकर शिंदे, तुळशीराम जगताप, मनोज राजेंद्र वाघ,चंद्रकांत एस काळकुटे, बाळासाहेब देविदास अहंकारे, संतोष भगवानराव गित्ते या पोलीस अधिका-्यांचा समावेश करण्यात आला आहे. या एसआयटीचे अध्यक्ष म्हणून बसवराज तेली हेच कायम राहणार आहेत. नेमकं कारण काय? समोर आलेल्या माहितीनुसार संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात जी एसआयटी नेमण्यात आली होती, त्या एसआयटीवर संतोष देशमुख यांच्या कुटुंबाकडून आक्षेप घेण्यात आला होता. यातील काही अधिका-यांचे वाल्मिक कराडशी संबंध आहेत, असा आरोप देशमुख यांच्या कुटुंबाने केला होता. त्यानंतर आता एसआयटी बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बसवराज तेली हेच नव्या एसआयटीचे अध्यक्ष राहणार आहेत, मात्र यातील काही पोलीस अधिक-यांची बदली करण्यात आली आहे.

## १८-जानेवारी रोजी नांदेड मध्ये जनआक्रोश मोर्चा



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी दि.१८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता नांदेडमध्ये जनआक्रोश मोर्चा निघणार आहे. हा मोर्चा महात्मा फुले चौक आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालय असा असणार आहे. सदरील मोर्चाला संबोधित करण्यासाठी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, मुलगी वैभवी देशमुख, मुलगा विराज देशमुख यांच्यासह मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, युवराज छत्रपती संभाजी राजे, नानासाहेब जावळे पाटील, आ. सुरेशअण्णा धस, ज्योतीताई मेटे, आ. संदीप क्षीरसागर, खा. बजरंगबाप्पा सोनवणे, नरेंद्र पाटील,अँड.मनोज आखरे, आ. जितेंद्र आव्हाड यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार यांची उपस्थित असणार आहे. सदरील मोर्चात सर्व राजकीय पक्षांचे, सर्व समाज बांधवांनी व भगिनींनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विजय नगर हनुमान मंदिर मंगल कार्यालय येथे पार पडलेल्या बैठकीत संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

## एकनाथ शिंदे भाकरी फिरवणार!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यात महापालिका निवडणुकांचे वेध लागले आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर राज्यात महापालिका निवडणुकांची कधीही घोषणा होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाच्या गोटात स्थानिक पातळीवर संघटना मजबुत करण्यासाठी वेगवान घडामोडी सुरु झाल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून तर मोठा निर्णय घेण्यात आला. एकनाथ शिंदे मुंबईत भाकरी फिरवणार असल्याची माहिती मिळत आहे. एकनाथ शिंदे आता स्थानिक पातळीवरची पदाधिका-ंची फळीच बदलण्याच्या तयारीत आहेत. शिवसेना मुंबईत प्रत्येक शाखेतील पदाधिका-यांची नव्याने नियुक्ती करणार आहे. त्यामुळे पक्षाला मुंबईत नाविन्याने आणि उत्साहाने पालिका निवडणुकीला सामोरं जाता येणार असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. शिवसेनेच्या प्रमुख नेत्यांची आज मुंबईच्या रंगशारदा सभागृहात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत याबाबतचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती रामदास कदम यांनी बैठकीनंतर दिली.ङ्खखासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईतल्या प्रमुख पदाधिका-यांची बैठक आज झाली. या बैठकीत संघटनात्मक चर्चा झाली. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीबाबत सुद्धा चर्चा झाली. येत्या २३ तारखेला मुंबईच्या बीकेसीमध्ये भव्य मेळावा पार पडेल. त्या मेळाव्यात शिवसेनेचे सर्व आमदार आणि खासदार यांचा भव्य सत्कार केला जाईल. मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार होईल. २३ तारखेला बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त हा मेळावा आयोजित केला आहे. मुंबईतील सर्व शाखाप्रमुख आणि सर्व पद रिक्त करून नवीन नियुक्ती केली जाईलङ्ख, अशी महत्त्वाची माहिती रामदास कदम यांनी दिली.

## जागतिक महिला दिनी जगावेगळ आव्हान स्वीकारणाऱ्या महिलांचा जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने होणार सन्मान : आयेशा



बीड । जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून यावर्षी आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जगा वेगळं आव्हान स्वीकारणाऱ्या ज्या मुली, महिला आहेत त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्वच क्षेत्रात ज्या महिलांनी आपल्या परीने यशस्वी होऊन वेगळं पण सिद्ध केल आहे अशा यशस्वी महिलांचा देखील विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यासाठी जगावेगळे आव्हान स्वीकारणाऱ्या महिला आणि आपल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या यशस्वी महिलांनी या पुरस्कारासाठी ७० ३० १४ ९३ २२ यावर तात्काळ संपूर्ण माहितीसह संपर्क साधावा असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या वतीने पत्रकार शेख आयेशा यांनी केले आहे. शुक्रवार दिनांक ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी आश्रय सेवा केंद्राच्या वतीने आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात येणार आहे. ज्या ज्या महिलांनी आव्हानात्मक क्षेत्र स्वीकारून त्यामध्ये यशस्वीपणे वाटचाल करत आहेत. अशा जगा वेगळं आव्हान स्वीकारणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. यासाठी पात्र असलेल्या जगावेगळे आव्हान स्वीकारणाऱ्या महिलांनी सन्मान स्वीकारण्यासाठी आपल्या नावाची नोंदणी १ मार्च २०२५ पर्यंत व्हाट्सअप नंबर ७० ३० १४ ९३ २२ वर आपला संपूर्ण पत्ता, व्यवसाय आणि वेगळं पण फोटोसह पाठवून नोंदणी करावी.

## संत बाळूमामा पालखी सोहळ्याचे रोहतवाडी कर यांच्या वतीने भव्य आयोजन माऊली स्किन क्लिनिक आयोजित मोफत त्वच्यारोग तपासणी शिबीर संपन्न




पाटोदा प्रतिनिधी : –जगाचे मालक श्री संत सद्गुरू बाळुमामा यांचा महिमा पूर्ण देशात आपणास पाहावयास मिळत आहे. त्यांच्या अनेक पालख्या विविध भागात फिरत असतात. मामांच्या तळावर सकाळ संध्याकाळ हजारो भाविक महाप्रसाद घेत असतात. मेंढी माऊलीची सेवा करण्यासाठी दूरवरून अनेक भावीक भक्त येत असतात. जगाच्या मालकाचा उघडा पसारा जिथे जाईल,तिथे मामाचा दरबार भरतोच. आणि यावर्षी पाटोदा वासियांचे भाग्य असे की गेल्या अनेक दिवसांपासून मामांची पालखी पाटोदा तालुक्यांमध्ये फिरत आहे . सद्गुरू संत बाळूमामा देवालय ट्रस्ट आदमापूर पालखी (बग्गा) न .९ चे कारभारी आप्पा माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पालखीची देखभाल चालू आहे.रोहतवाडी वासियांचे भाग्य असे की, गेल्या काही दिवसापासून मामांची पालखी रोहतवाडी गावात आल्याने गावातील वातावरण आनंदमय झाले आहे. तसेच गावक-यांकडून उत्कृष्ट प्रकारे नियोजन करण्यात येत आहे आज मामाच्या तळावर गावातील भूमिपुत्र डॉ. नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य त्वचारोग तपासणी शिबिरा चे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात अनेक भाविक भक्तांनी सहभाग नोंदवून आपल्या आरोग्याबाबत तपासण्या करून घेतल्या आहेत. या शिबिरास पूर्णत्वाकडे नेण्यासाठी गावातील सर्व युवकांनी पुढाकार घेऊन उत्तम प्रकारे नियोजन केले होते.तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी मामांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा.

# मनोज जरांगे पाटील यांना मिठी मारून धनंजय देशमुख ढसाढसा रडले



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला एक महिना उलटला आहे. त्यांच्या हत्येनंतर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने मोर्चा काढण्यात येत होता. यानतंर आज संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी आक्रमक होत स्वतः पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. जवळपास दोन तासांपासून अधिक काळ त्यांचे हे आंदोलन सुरु होते. यानंतर मनोज जरांगे पाटील आणि बीडचे एसपी यांनी संवाद साधल्यानंतर धनंजय देशमुखांनी आंदोलन मागे घेतले. पाण्याच्या टाकीवरुन उतरताच धनंजय देशमुखांनी मनोज जरांगेंना मिठी मारत जोरजोरात हंबरडा फोडला. यानंतर धनंजय देशमुख यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. माझ्या भावाला ज्यांनी संपवलं. ज्यांनी कटकारस्थान केलं. त्यांना फाशी द्य, अशी मागणी धनंजय देशमुख यांनी दिली. मला अस्वस्थ वाटतंय. उलट्या होत आहेत. मी काही वेळाने बोलतो, असेही त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना सांगितले. एसपींकडून आश्वासन काय? धनंजय देशमुख हे पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करत असताना मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी त्यांचे आदोलन सुरुच ठेवले. यानंतर बीडचे एसपी नवनीत कॉवत यांनी धनंजय देशमुख यांना आश्वासन दिले. मी एसआयटीचे अधिका-यांशी बोलणं करून देतो, असं आश्वासन एसपी नवनीत कॉवत यांनी दिल्यानंतर धनंजय देशमुख हे टाकीवरुन खाली उतरले. वैंभवी देशमुख काय म्हणाली? याआधी प्रसारमाध्यमांशी बोलताना संतोष देशमुख यांची मुलगी वैंभवी देशमुख हिने संवाद साधला. यावेळी तिने आम्ही न्याय मागतो. रस्त्यावर आलो. शांततेत न्याय मागतो. तरीही आम्हाला न्याय का मिळत नाही, असा सवाल उपस्थितीत केला आहे. माझ्या घरासमोर पोलिसांचा ताफा असताना माझा चाचा आंदोलन करतोय. मग पोलीस करतात काय? आज माझे पप्पा गेले, उद्या चाचाला गमावलं तर आम्ही काय करायचं? जसा चाचा वर गेलाय, आरोपींना अटक नाही झाली तर आम्ही टाकीवर जाऊ. आम्हाला काही झालं तर संपूर्ण पोलीस प्रशासन पुढचं बघून घेईल. आमचा एक माणूस गेला तरी पोलीस आरोपींना पकडत नाही. मग आमच्या कुटुंबातील सर्व जातील तेव्हा पोलिसांचे डोळे उघडतील. आरोपींना पकडतील, असे वैंभवी देशमुख म्हणाली. आम्ही चाच्याशी बोललो नाही. तो चार दिवसापासून तणावात आहे. आम्हाला केसमध्ये काय चाललंय ते कळलं पाहिजे. आम्हाला काहीच सांगितलं जात नाही. फक्त पोलीस येतात आणि उभं राहतात. पण केसची प्रक्रिया काय चाललीय? तपास कुठपर्यंत आलाय? याची काहीच माहिती दिली जात नाही. आम्हाला त्याबाबत अजूनही काही माहीत नाही. आम्ही सर्वांनी टाकीवर चढल्यावर यांचे डोळे उघडणार आहे का? असेही वैंभवी देशमुखने सांगितले. आमच्या कुटुंबासोबत जे घडलं ते इतरांवर येऊ नये. महाराष्ट्र आपल्याला पुढे न्यायचा आहे की मागे न्यायचा आहे. न्याय मिळत नाही. मग आम्ही तरी जगून काय करायचं? आमच्या घरातील एक सदस्य गेलाय ना. आम्ही न्याय मागतो. रस्त्यावर आलो. शांततेत न्याय मागतो. तरीही आम्हाला न्याय का मिळत नाही.

## संपादकीय

### चिनी प्रकल्पांचे आव्हान

भारत आणि चीन यांच्यात लडाखच्या पूर्व भागात संघर्षबिंदू ठरलेल्या ठाण्यांवरील सैन्यमाघार पूर्ण होऊन दोन महिन्यांचा कालावधीही पूर्ण झालेला नसताना चीनच्या नव्या कुरापती समोर येत आहेत. आपल्या प्रदेशात पायाभूत सुविधा उभारून अधिक आक्रमक होण्याचे हे तंत्र आहे. सुविधा आणि प्रकल्प यांद्वारे आव्हान निर्माण करण्याची ही चिनी खेळी काही नवीन नाही. पूर्वीपासूनच चीन याचा अवलंब करीत आला आहे. लडाखचा काही भाग चीनकडे असून, तो त्याला ङ्गअक्साई चीनफ म्हणतो. हा प्रदेश चीनच्या शिंजियांग प्रांताच्या दक्षिणेला होतान भागात येतो. तिथे नव्याने खेडी वसविण्याचे धोरण चीनने आखले आहे. त्यानुसार त्या भागात सात खेडी वसविली गेली आहेतच; त्यामध्ये तो आणखी दोन खेड्यांची भर घालत आहे. भारताच्या सीमेलगतच्या आपल्या प्रदेशात पायाभूत सुविधा विकसित करण्यापासून वसाहती निर्माण करण्यापर्यंतचे पाऊल चीन जाणीवपूर्वक टाकत आहे. दुसरीकडे तो नदीचे पाणी अडवून त्यांवर महाकाय प्रकल्पही राबविण्यासाठी पुढे सरसावला आहे. ब्रह्मपुत्रा नदी तिबेटमधून भारतात येते. यार्लंग संगपो या नावाने ती तिथे ओळखली जाते. या नदीवर जगातील सर्वांत मोठा जलविद्युत प्रकल्प सुरू करण्याला चीनने नुकतीच मंजुरी दिली आहे. सुमारे साठ हजार मेगावॉट ऊर्जानिर्मितीच्या या प्रकल्पामुळे भारताच्या वाट्यााला येणारे पाणी अडविले जाणार आहे. खेडी वसविण्यापासून पाणी अडविण्यापर्यंतच्या चीनच्या या दोन्ही प्रकल्पांचा फटका भारताला बसणार आहे. त्यामुळे त्यांवर नवी दिल्लीने घेतलेले आक्षेप योग्यच आहेत; परंतु केवळ आक्षेप नोंदवून स्वस्थ बसता येणार नाही. भारत आणि चीन यांच्यातील सीमाप्रश्नावर वाटाघाटी आणि चर्चा यांतूनच तोडगा निघू शकतो. एकीकडे वाटाघाटीची भाषा करायची आणि दुसरीकडे सीमेवर कुरापती करायच्या, अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांना चिनी नावे ठेवायची, तेथील नागरिकांना व्हिसाविना परवाना द्यायचे आदी कृत्ये चीन नियमितपणे करीत आला आहे. याशिवाय भारतीय हद्दीत सैन्य घुसवून आपली सीमा पुढे रेटण्याच्या कारवायाही तो करतो. यातूनच डोकलाम, गलवान आदी संघर्ष निर्माण झाले. भारताकडून जोरदार प्रत्युत्तर मिळाल्यानंतर चीन माघार घेतो; परंतु पुन्हा तो आक्रमक होतो, असा आजवरचा अनुभव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे ऑक्टोबरमध्ये ङ्गब्रिक्सफ परिषदेच्या निमित्ताने भेटले. त्यावेळी दोघांत झालेल्या चर्चेमुळे आणि सैन्यमाघारीमुळे दोन्ही देशांमधील तणाव काहीसा निवळला खरा; मात्र, चीन नव्याने कुरापती काढणार, अशी अटकळ होतीच. होतानमध्ये खेडी वसविण्याच्या हालचालींनी ती खरी ठरविली आहे. मुळात भारताकडून बेकायदा बळकावलेल्या प्रदेशात ही खेडी वसविली जात असल्याकडे नवी दिल्लीने चीनचे लक्ष वेधले आहे. याबाबत भारताने चीनचा राजनैतिक मार्गाने निषेध नोंदविला असला, तरी पुढे काय, हा प्रश्न आहे; कारण होतानमधील खेड्यांची संख्या वाढते आहे. सीमेच्या भारताच्या बाजूकडील पायाभूत सुविधा वाढविणे आणि चीनकडून येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या आक्रमणासाठी सज्ज राहणे, हा उपाय आहे. त्यामुळे याबाबतच्या धोरणावर भारताने जोर द्यायला हवा. ब्रह्मपुत्रा नदीवरील प्रकल्प ही भारतासाठी नक्कीच चिंताजनक बाब आहे. नदी ज्या भागातून जाते, तेथील सर्वांचा तिच्या पाण्यावर अधिकार असतो. ब्रह्मपुत्रा नदीचे पाणी अडवून चीन महाकाय प्रकल्प उभारत आहे. कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करून वैश्विक तापमानवाढीतील आपला वाटा कमी करण्यासाठी हा प्रकल्प राबवीत असल्याचे चीन सांगत आहे. कार्बन उत्सर्जन कमी होणे आवश्यकच आहे; परंतु त्यासाठी दुसऱ्यांच्या हक्काचे पाणी पळविणे, हा उपाय नाही. तिबेटमधून अरुणाचल प्रदेशात प्रवेश करण्याच्या आधी ब्रह्मपुत्रा नदी एक मोठे वळण घेते. तिथे सुमारे १३७ अब्ज डॉलर खर्चून चीन प्रकल्प उभारणार आहे. अशा प्रकारचा हा जगातील सर्वांत मोठा प्रकल्प असेल. यामुळे मोठा जलाशय निर्माण होईल. त्याचा परिणाम भारतावर होणे स्वाभाविक आहे. यामुळेच भारताने याबाबत चीनकडे तक्रार केली आहे. या प्रकल्पामुळे भारताच्या वाट्याचे पाणी कमी होणार नसल्याचा दावा चीनने केला असला, तरी त्यामुळे वस्तुस्थिती बदलणारी नाही. चीनकडून असा प्रकल्प राबविला जात असताना भारत काय करू शकतो, हा प्रश्न आहे. मात्र, याबाबत भारताकडे फारसे पर्याय नाहीत. या मुद्द्यावरून दोन्ही देशांमधील तणाव वाढण्याची चिन्हे दिसतात. चीनचे आव्हान यापूर्वीही सोपे नव्हते; ते आता आणखी अवघड बनले आहे.

## आपरंपरिकम ऊर्जा
## सूर्याचा देश अनसुर्याची उर्जा:..!



आपला देश हा सुर्यप्रकाशाचा देश आहे. युरोपातील समशितोष्ण वातावरणात सूर्य दर्शन ही पर्वणी ठरते मात्र आपल्याकडे काही पावसाचे दिवस वगळले तर इतर वेळी लख्ख सुर्यप्रकाश असतो आणि याचाच वापर करुन उर्जा निर्मितीला गती देण्यात आली. ज्यात होणारा प्रारंभिक खर्च अधिक असला तरी यात दीर्घकालीन फायदा आणि शाश्वत विकास हा खूप मोठा फायदा आहे. सोबतच निसर्ग संवर्धनातुन लागणारा हातभार वेगळा. कार्बन उत्सर्जन आणि त्याचे धोके आपणा सर्वांना माहिती आहे. औद्योगिकरणाची गरज म्हणून सर्वाच ठिकाणी ऊर्जा निर्मितीसाठी जिवाश्म अर्थात कोळशावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प उभे राहिले. सातत्याने कार्बन उत्सर्जन करणा-या या प्रकल्पांनी निसर्गाचे चक्र बिघडविले आहे. ऋतू मर्यादा ओलांडणे, अतिवृष्टी, महापूर आदी संकटे याम ुळेच सुरु झाली. जागतिक स्तरावर कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत आणि आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे आपण यात गतीने नाटचाल करीत आहोत.निसर्गाला वेठीस धरून त्याच्या साधन सुविधांचा गैरवापर टाळावा आणि आपल्या भागात असलेल्या सर्व जमेच्या बाजू एकत्र करून विकास साधावा याचा वस्तुपाठ आपण या निमित्त जगापुढे मांडत आहोत.हिमालय आणि उत्तरेचा काही राज्यांचा भाग वगळता देशात सर्वत्र सूर्यप्रकाश मुबलक प्रमाणात आहे याचा वापर करून सौर ऊर्जा निर्मिती करणे सुरू झाल्याने आपला जिवाश्म इंधनाचा वापर हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न आहे. केवळ सौर ऊर्जाच नव्हे तर इतरही ग्रीन एनर्जी पर्याय हाताळले जात आहेत.केवळ सौर ऊर्जेचा विचार केला तर देशाने यात खूप मोठा टप्पा गाठला आहे असे म्हणता येईल. यात आपण प्रतिवर्षे २०० टक्क्याहून अधिक गतीने पुढे जात आहोत जून २०२४ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार देशात ८७.२ गिगा वॅट सौर ऊर्जे चे उद्दीष्ट आपण गाठले आहे.देशाचे अपारंपरिक उर्जा/पर्यायी ऊर्जा निर्मितीचे २०३० चे एकुण उद्दीष्ट ५०० गिगावॅट इतके आहे यातील निम्म्याहून अधिक ऊर्जा अर्थात ३०० गिगा वॅट ऊर्जा निर्मिती सौर ऊर्जा असावी असे अपेक्षित आहे. देशामध्ये ज्यावर शेती शक्य नाही अशा जागांव सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांची उभारणी करण्याचा निर्णय पहिला टप्यात घेण्यात आलेला आहे. यासोबतच विजेचा वापर करणारा व स्वतचे घर असणारा देशातील प्रत्येक नागरिक या सौर उर्जा निर्मितीमध्ये स्वतःचा खारीचा वाटा उचलण्यास सक्षम आहे. नागरिकांनी आपापल्या घरावर ३ किलो वॅट ते ५ किलो वॅट चे सौरउर्जा निर्मिती उद्दीष्ट ठेवावे आणि याला बॅक कर्जा सोबत ७६ हजारापर्यंत अनुदान अशी जोड देण्यात आली आहे. अशा पध्दतीने उर्जा निर्माण करुन ती वीज करुन ती वीज निर्मिती कंपनीला पाठवायची आहे. घरात कंपनीची वापरलेली वीज आणि आपण केलेली निर्मिती यातील फरक केवळ वीज देयक स्वरुपात कंपनीला द्यायचा अशी ही सौर उर्जा योजना आहे आणि याच्या दिर्घकालीन वित्तीय लाभाच्या गणितामुळे आता चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. नागरिकांनी स्वतःच्या घराच्या छतावर उर्जा निर्मितीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे आणि अशी उर्जा उद्योग- शेतीकडे वळविता आल्यास विकासाची गती वाढणार हे नक्की आहे. निसर्ग समतोल आणि आर्थिक स्तरावर सुवर्णम ध्ये साधणारी सौर उर्जा निर्मिती यासाठी देशाला आवश्यक आहे.

**प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**९८२३१९९४६६**

## आर.एन.डी. विद्यालयातून विद्यार्थ्यांना मिळते भविष्याची शिदोरी : सागर धस
## आर.एन.डी. विद्यालयात जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रमाची रेलचेल!
### शिवव्याख्याते गणेश भोसले यांच्या व्याख्यानाने विद्यार्थ्यात नवचैतन्य!
### विविध उपक्रमाचे बक्षिस वितरण आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे उपक्रम






पाटोदों प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील मुगगांवच्या राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर.एन.डी. उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ म हाविद्यालय मुगगांव येथे दरवर्षीप्रम ाणे याही वर्षी जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते रांगोळी वकृत्व स्पर्धा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान देखील या ठिकाणी करण्यात आला त्याचबरोबर शिवव्याख्याते गणेश भोसले यांच्या शिवव्याख्यानाच देखील आयोजन करण्यात आले होते. राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर. एन. डी. उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ म हाविद्यालय मुगगांव मध्ये दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सव आयोजित केला जातो यामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी उपक्रम आयोजित करून त्या ठिकाणी त्यांचा सन्मान केला जातो विविध स्पर्धेचे आयोजन यावर्षी करण्यात आले होते रांगोळी स्पर्धा वकृत्व स्पर्धा तसेच जिल्हा राज्यस्तरीय खेळांमधून पुढे गेलेल्या विद्यार्थ्यांचा या ठिकाणी सन्म ान करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे सागर धस यांनी विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावं यासाठी सर्व गोष्टी परिपूर्ण करण्यासाठी संस्थेला योग्य मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांनाही पुढील योग्य दिशा देण्यासाठी बळ मिळावं असे मार्गदर्शन केले तसेच शिवव्याख्याते गणेश भोसले यांनी त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असे मार्गदर्शक तत्वे सांगितले आणि जगण्याचा मंत्र सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना जागृत करण्याचे काम केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय खोटे यांनी संस्थेविषयी आणि भविष्यातील सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी विविध उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना मोठ्या पदावर घेऊन जाण्यासाठी आम्ही त्यांना योग्य ते शिक्षण देण्याचा प्रयत्न करू असेही सांगितले तसेच पत्रकार प्राध्यापक सचिन पवार यांनी देखील मनोगत व्यक्त करताना महापुरुषांचे विचार आचरणात आणावेत आणि त्यांचा इतिहास वाचताना त्यांचे विचार घेताना त्यांनी केलेला संघर्ष हा डोळ्यासमोर ठेवून आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करत रहावे असे सांगितले त्याचबरोबर अनेक मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते सागर आप्पा धस, युवा उद्योजक महेश दादा हंबर्डे, माऊली आप्पा जरांगे, गोवर्धन सुळे कांतीलाल गिरी तर एक क्रमाचे अध्यक्ष म्हणून राजम ाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर एन डी उर्फ रामचंद्र निवृत्ती धस कनिष्ठ महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मुगगांवचे माजी सरपंच संजयजी खोटे हे होते. तरी या कार्यक्रमासाठी रघुनाथ सुळे चेअरमन निवडुंगा, भीमराव सरोदे सर, प्राचार्य भवर सर, मुख्याध्यापक येटकळ सर, शिरसाट सर, कापसे सर, गिरी सर, प्राध्यापक अशोक पवार सर, लगड सर साळुंखे सर कटके सर, प्राध्यापक सचिन पवार, तांबारे सर, प्राध्यापक गजधने, प्राध्यापक महादेव वराड, प्राध्यापक माणिक वराड, इंगळे, शेषराव सुळे, त्रिंबक गाडे, नितीन थोरात यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेळके सर यांनी केले प्रस्ताविक भवर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खोटे सर यांनी केले.

### सेवापूर्ती कार्यक्रम

स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय मुगगांव चे लालासाहेब गोपाळराव वीर सर यांची सेवापूर्ती पूर्ण झाल्याने त्यांचा कार्यक्रम जिजाऊ जयंती निमित्त आयोजित करण्यात आला होता यावेळी उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांनी केलेल्या तीस वर्षाच्या सेवेवर प्रकाश टाकताना मान्यवरांनी त्यांच्या कामाचं कौतुक केलं.

### संजय खोटे यांच्या संकल्पनेतून उभा राहिलेले आर एन डी विद्यालय

एक सर्वसामान्य व्यक्ती काय करू शकतो हे संजय खोटे यांच्याकडे पाहिल्यानंतर लक्षात येतं सामाजिक क्षेत्रात चळवळ करत असताना स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयात शिपाई म्हणून काम करताना मनात संकल्पना आली आणि विद्यालय स्थापन केलं फक्त एवढंच म्हटलं तर विषय संपेल पण त्यांनी केलेला संघर्ष त्यांच्यातील जिद्द चिकाटी त्यातून उभा राहिलेलं आर्यन टी विद्यालय हे आज नावारूपाला आला आहे. विद्यालयातून अनेक विद्यार्थी घडले मोठ्या पदावर गेले विद्यालयाचे नाव मोठं होत गेलं आज विद्यालय पाटोदा तालुक्यात नावा रुपाला आल आहे त्याला एकम ेव कारण ठरलं ते म्हणजेच संजय खोटे यांची जिद्द-चिकाटी आणि संघर्ष खरच त्यांच कौतुक करायलाच हवं....

### सागर धस यांच्याकडून वीर सरांच्या कार्याचे कौतुक!

स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुगगाव चे सेवानिवृत्त शिक्षक लालासाहेब गोपाळराव वीर यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमांमध्ये बोलताना सागर धस यांनी त्यांच्या तीस वर्षाच्या कार्यकाळाचा लेखाजोखा मांडला आणि त्यांच्या कार्याचे कौतुक केलं भविष्यामध्ये त्यांनी आता स्वतःचं आयुष्य जगावं असं ही त्यांनी या ठिकाणी नमूद केले.

## संतोष देशमुख हत्याप्रकरणात मनोज जरांगेंना वेगळीच शंका, थेट मुख्यमंत्र्यांचं नाव घेत म्हणाले?

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली. या हत्याकांडानं राज्यभरात खळबळ उडाली. या घटनेला आता एक महिना उलटून गेला आहे. या प्रकरणातील आठ आरोपींवर मोक्का लावण्यात आला आहे. मात्र या प्रकरणात वाल्मिक कराड याच्यावर देखील आरोप झाले होते. तो सध्या सीआयडी कोठडीत आहे. मात्र त्याच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आलेली नाहीये. त्यामुळे आता मस्सोजोगचे ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले आहेत. आज वाल्मि क कराड याच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करावी या मागणीसाठी ग्रामस्थानी पण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलं. या आंदोलनात संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख देखील सहभागी झाले होते. जर कराडवर मोक्का लावला नाही तर मी पाण्याच्या टाकीवरून उडी मारणार असा इशारा त्यांनी दिला होता.दरम्यान त्यानंतर



आंदोलनस्थळी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील देखील पोहोचले, यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे, मुख्यमंत्री आरोपी वाचवायला लागले आहेत, अशी आता शंका येते. खंडणीतला आरोपी आहे तो , तुमचं सरकार चालवतो का? असं समजायचं का? असा सवाल यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, तुम्हाला अजून चाटेचा मोबाईल सापडत नाही, त्यामध्ये खूप पुरावे असतील म्हणून तर तो मोबाईल फेकून दिला. देशमुख कुटुंबीयांना धक्का लागला तर आम्हाला सुद्धा मराठे म्हणतात. देशमुख कुटुंबातील एकाही म णसाच्या जीवाला काही झालं तर धनंजय मुंडेंच्या टोळीचं जगणं मुश्किल होईल. जर मुख्यमंत्र्यांनी राज्य विद्रूप करायच ठरवलं असेल तर आमचाही नाविलाज आहे. आम्ही धनंजय मुंडेंच्या टोळीची मजा मस्ती उतरवणार, फडणवीस साहेबांना विनंती आहे यांना मोक्का लावा. या प्रकरणात शेकडो नाही तर हजारो पुरावे आहेत, एवढे पुरावे असून तुम्ही यांना ३०२ मध्ये नाही टाकलं. मुख्यमंत्री साहेब तुम्ही त्यांना सांभाळत आहात, असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## संयम व सहनशक्तीची अपूर्व देणगी राजकारणाने दिली -मुख्यमंत्री

नागपूर । प्रतिनिधी संयम, सहनशिलता याची अपूर्व देणगी राजकारणातून मिळाली असे मी एका अर्थाने समजून घेतो. राजकारणात आल्यानंतर तुम्हाला वाटेल तसे, वेळ प्रसंगी अपशब्दही सहन करावे लागतात. गत पाच वर्षात काहींनी अनेक पध्दतीने मला अपमानीत करण्याचा प्रयत्न केला. यात माझ्या कुटुंबाच्याही वाट्याला बरेच काही आले. ही सहनशक्ती, संयम, एका अर्थाने स्थितप्रज्ञता मी आपले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कडून शिकलो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. स्वर्गीय विलास फडणवीस यांच्या जयंतीनिमित्त जिव्हाळा बहुउद्देशिय विकास संस्थेच्या जिव्हाळा पुरस्कार वितरण सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. ज्येष्ठ संपादक तथा व्याख्याते विवेक घळसासी यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली. धरमपेठ महिला को ऑपरेटिव्ह सोसायटी येथे आयोजित या समारंभास संस्थेच्या अध्यक्ष निलिमा बावणे, अविनाश संघवई, नागेश पाटील, श्रीधरराव गाडगे आदी उपस्थित होते. विद्यार्थी चळवळीत असतांना मला राजकारणात येण्याची अजिबात इच्छा नव्हती. एक स्वयंसेवक म्हणून आपल्या परिने समाजाला योगदान द्यायचे हे निश्चित केलेले होते. स्वयंसेवकाला जे सांगितले ते त्याने करायचे असते असे विलास फडणवीस यांनी सांगून मला काही पर्याय ठेवला नाही, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. राजकारणात सहनशक्तीचा कस लागतो. समाजात जे काही चांगले दिसले त्यापासून मी शिकत आलो आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीकोनातून जे प्रकल्प हाती घेतले ते त्याच शिकवणुकीतून पूर्ण करत आलो. स्वर्गीय विलास फडणवीस यांच्यातील उपक्रमशिलतेचा गुण अंगिकारला असे सांगून त्यांनी त्यांच्या कार्याला उजाळा दिला. कॅन्सर इन्स्टिट्यूट पासून इतर संस्था या समाजाला योगदान देणाऱ्या अशा व्यक्तींप्रतिची एक कृतज्ञता असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री पदाची संधी मधल्या काळात मिळाली होती. आपण ज्या संस्कारातून आलो त्या संस्कारात पदाला महत्व नाही हे मी माझ्या मनावर कायमचे बिंबविले आहे. कोणतेही पद हे आपल्या सुखासाठी नाही तर ज्यांच्यासाठी आपण पदावर आलो त्या घटकांना सुखी करण्याचे पद हे माध्यम आहे अशी माझी मनापासून धारणा आहे.

# संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

गेवराई (प्रतिनिधी) श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बेलगाव व बागपिंपळगाव सेवा सोसायटी चेअरमन जनार्धन आप्पा चितळकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवास देवकते, जि.प केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख नामादेव शिंदे सर, गणेश मुगूटराव, भागवत साकळे, अभिमन्यू ठोंबरे, हैसाबाई कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळेतील ५वी ते १० वी वर्गातील कल्याणी गोरे, श्रध्दा बळवंते, सोनल पडुळे, अश्विनी देवकते, दिपाली माळी, वैशाली देवकते, कल्याणी देवकते, वक्ते, श्रृती मुगूटराव, अमृता सुरकुंडे, साक्षी कोळेकर, सिध्दी खटावकर, शिवाणी माळी आदी विद्यार्थ्यांदी यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी आपल्या शब्दात आपले विचार केले. तर काही विद्यार्थ्यांनी गिताव्दारे जिजाऊ माँ साहेब यांच्या जिवन कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणाले शिवरायांचं चरीत्र हे फक्त ढाल, तलवारी अन् घोड्यांच्या टापा नाहीत तर सर्वसामान्यांना जिवन जगण्यासाठी सगळ्यात मोठा शिवमंत्र आहे. शिवरायांना घढविणाऱ्या ह्या जिजाऊ माँ साहेब आहेत. त्याच प्रमाणे आपल्या आई वडिल व गुरुजनांकडून चांगले धडे घेऊन हे चांगले विचार आपल्या जीवनात आचरणात आणावे तसेच गेली अनेक वर्षांपासून शेतकरी समृद्ध होत नाही. याची कारण शेतकऱ्यांच्या मुलांनी शोधून काढली पाहिजेत शेतकरी गरीबीतून बाहेर कसा येईल याचा विचार केला पाहिजे. त्याच प्रमाणे स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करून देश कार्य करावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

# मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान अतुलनीय - डॉ. भालचंद्र कुलकर्णी




माजलगाव प्रतिनिधी दिनांक १०/०१/२०२५ स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबाद संस्थानामध्ये सामान्य लोकांसाठी कार्य करताना शैक्षणिक, सामाजिक प्रबोधन करण्यासाठी अथक प्रयत्न केले त्यामुळे ही चळवळ स्वातंत्र्य लढा झाली. असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. भालचंद्र कुलकर्णी यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळ आणि भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक व भा. शि. प्र संस्था केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख डॉ. प्रे. म. राठोड यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मस्वातंत्र्योत्तर काळात मराठवाडा प्रदेशाच्या विकासात स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदानफ या विषयी सविस्तर मांडणी करताना ते म्हणाले की, मराठवाडा मुक्ती संग्रामचा लढा हा स्वातंत्र्याचा अखेरचा लढा होता. या लढ्यामध्ये शिक्षकांचा सक्रीय सहभाग होता. त्यामुळे मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासात स्वामी रामानंद तीर्थ यांनी अंबाजोगाई, नांदेड या भागामध्ये भरीव योगदान देत लोकांचा शैक्षणिक विकास साधत त्यांचे राष्ट्रीयत्व जागे केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी म्हटले की, तरुण पिढीसमोर आपल्या भागातील वीरांचा इतिहास समोर ठेवून त्यापासून प्रेरणा देण्याचा स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचा उद्देश आहे. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संकुलाचे पालक व भा. शि. प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड म्हणाले की, मराठवाड्याला विकासाच्या प्रवाहात आणण्याचा अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी प्रयत्न केला. त्यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ अग्रणी होते. अशा वीरांच्या गाथा व्याख्यानातून स्मरण केल्या तरच तरुणांमध्ये राष्ट्रभक्ती जागृत ठेवता येईल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी केले. तसेच कार्यक्रमात मान्यवरांचे आभार आणि कल्याण मंत्र डॉ. प्रेम राठोड यांनी केले.या व्याख्यानास बहुसंख्य प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रा.अनिल पाटील यांना पीएच.डी पदवी प्रदान



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : बळीराम पाटील महाविद्यालातील प्रा.अनिल पाटील यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत भूगोल विषयात पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी किनवट तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येवर संशोधन प्रबंध सादर केला असून त्यांचा संशोधनाचा विषय ङ्ग किनवट तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचा स्थलकाल सापेक्ष अभ्यास असून त्यांना विद्यापीठातील अधिष्ठाता डॉ. पराग खडके यांनी मार्गदर्शन केले तर डॉ. शिवाजी पाटील हे बाहय परीक्षक आणि भूशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. अविनाश कदम हे समितीचे चेअरमन होते प्रा.अनिल पाटील हे एक अभ्यासू व्यक्तिमत्व असून त्यांनी बोर्ड परीक्षा, परीक्षक, नियामक, मुख्य नियामक, पेपर सेटर, बारावी पुस्तक समिक्षण, मुल्यमापन आराखडा, नविन अभ्यासक्रमाचे विभागीय साधन व्यक्ती, नविन शैक्षणिक धोरण-२०२० चे साधन व्यक्ती अशा अनेक क्षेत्रात त्यांनी काम केले असून ते कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असून संशोधनाचे कार्य केल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या यशाबद्दल किनवट शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बेंबरेकर, उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे, पर्यवेक्षक प्रा.विजय खूपसे, कार्यालय अधिक्षीका श्रीमती यमुना कुमरे, सरस्वती शिक्षण संस्थेचे सचिव तथा मुख्याध्यापक श्री. कृष्णकुमार नेम्मानीवार, पर्यवेक्षक प्राध्यापक रेणुकादास पहुरकर डॉ. सुनील व्यवहारे प्रा. प्रमोद रहाटे, प्रा. सुहास कुलकर्णी, राजे छत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सागर शिल्लेवार, सुमतीबाई हेमसिंग नाईक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती. संगिता राठोड, केंद्रप्रमुख श्री.आर.टी. राठोड, विद्यापीठातील डॉ. अर्जुन भोसले, डॉ. प्रमोद वाघमारे, डॉ. मारोती देशमुख, डॉ. येन्नावार, डॉ. श्रीनिवास रेडडी, जि.प. शिक्षक श्री.योगेश वैद्य, श्री. गजानन दारमवार, प्रा.प्रकाश उत्तरवार, डॉ. प्रफुल्ल गायकवाड, महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे डॉ. हेमंत सोनकांबळे, प्रा. सतिष चौधरी, प्रा.होनराव, प्रा. व्ही.एल. कांबळे, डॉ. विद्या पाटील, प्रा. ठाकूर, प्रा. संतोष चव्हाण, प्रा. शाहबाज शेख तर महाविद्यालयातील प्रा.डॉ. एस. आर. शिंदे, डॉ. शुभांगी दिवे, प्रा. ममता जोनपेल्लीवार, ग्रंथपाल प्रा. मंदाकिनी राठोड, डॉ. आनंद भालेराव, डॉ. गजानन वानखेडे, डॉ. योगेश सोमवंशी, प्रा. शिवदास बोकडे, डॉ. सुलोचना जाधव, प्रा. राजकुमार नेम्मानीवार, प्रा. किशन मिरासे, प्रा.एस.एस.माने, प्रा. आम्रपाली हटकर, डॉ. प्रज्ञा घोडवाडीकर, डॉ. रत्ना कोमावार, प्रा.डी.टी. चाटे, प्रा. काझी, डॉ. पेंडलवाड, प्रा. येरडलावार, डॉ. विजया खामनकर, प्रा. पुनम बडोदेकर, प्रा. प्रियंका जाधव, प्रा. ऋतूजा क-हाळे, प्रा. अनिकेत पहूरकर, श्री. दीपक खंदारे, इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले.

# स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाड्याला निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त करण्याचे कार्य केले - डॉ. बालाजी बोडके

माजलगाव प्रतिनिधी दिनांक १०/०१/२०२५ स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाड्याला ख-या अर्थाने निजामांच्या जुलमी राजवटीतून मुक्त करण्याचे कार्य केले. असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. बालाजी बोडके यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळ, इतिहास विभाग आणि भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे पहिले पुष्प



गुंफताना प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख डॉ. प्रे. म. राठोड, प्रा. सुदर्शन स्वामी यांची उपस्थिती होती. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महैदराबाद मुक्ती संग्रामात स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदानफ या विषयी सविस्तर मांडणी करताना ते म्हणाले की, मराठवाडा हा देश स्वातंत्र्यानंतरही पारतंत्र्यातच होता आणि हे पारतंत्र्य दूर करण्याचे अतिशय कठीण कार्य मराठवाड्यातील १०५ हुतात्मा यांचे बळी देऊन झालेले आहे. त्या सर्व हुतात्म्यांची प्रेरणा आजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या स्मरणी ठेवली पाहिजे. म्हणूनच मराठवाडा निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाला. स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये ही चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला. आणि ती फक्त चळवळच राहिली नाही तर लोक या चळवळीत स्वतःहून सामील होऊ लागले. कारण या अन्यायी व जुलमी राजवटीतून स्वतःची सुटका करून घ्यावयाची असेल तर आपणही सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे अशी सामान्य लोकांची धारणा झाली आणि लोकांनी या चळवळीत स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारख्या देशप्रेमी लोकांना सक्रिय मदत केली.

# शासकीय कापुस खरेदी पुढील आदेश येईपर्यंत बंद राहिल- सभापती जयदत्त नरवडे

बीड : प्रतिनिधी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या पदाधिऱ्यांची ऑनलाईन बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अक्षतेखाली संपन्न झाली.याप्रसंगी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.संजय तुपे यांनी प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी,बीड जिल्हाध्यक्ष अजय भांगे यांच्या सहमतीने व प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांच्या निर्देशाने हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या बीड जिल्हा उपअध्यक्षपदी अशिष अशोक भालेराव माळेगाव ता. केज जिल्हा बीड यांची नियुक्ती केली. हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या वतिने बीड जिल्हा उपअध्यक्ष अशिष अशोक भालेराव माळेगाव यांची नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी,प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालाजी अडियाल, प्रदेश उपाध्यक्ष प्रा.संजय तुपे,प्रदेश महासचिव विनोद भोकरे, विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद, महाराष्ट्र प्रदेश मिडिया प्रभारी अमजद पठाण, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य धनंजय तरारे,राम



कोडवते,महेश भैरम,विदर्भ विभागीय अध्यक्ष मो.तारेक शेख,मराठवाडा विभागीय अध्यक्ष शेख वसिम आझाद-,नागपूर जिल्हा अध्यक्ष देवेंद्र मुरकुटे,बीड जिल्हाध्यक्ष अजय भांगे,बुलढाणा जिल्हा अध्यक्ष मिर्झा अक्रम बेग,वर्धा जिल्हा अध्यक्ष तन्वीर अशरफ,अमरावती जिल्हा अध्यक्ष मुबिन शेख,सोलापूर जिल्हा अध्यक्ष विश्वास चोपडे,धुळे जिल्हा अध्यक्ष विजय चव्हाण, गोंदिया जिल्हा अध्यक्ष गौरव कुमार,वाशिम जिल्हा अध्यक्ष अनिल चाबुकस्वार,औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष अकील काज़ी,जालना जिल्हा अध्यक्ष शबाब बागवान,उस्मानाबाद जिल्हा अध्यक्ष अतिक औटी,रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष वैभव भोसले,बदनापूर तालुका अध्यक्ष इलियास बेग,परतूर तालुका अध्यक्ष शेख महेबुब,भोकरदन तालुका अध्यक्ष अनिस शेख, घनसावंगी तालुका अध्यक्ष अशोक घुमरे, संदिप देवडे आदिंनी त्यांचे अभिनंदन केले.

# संम्मेलनास अण्णाभाऊ साठेंच्या नावाची मागणी

बीड - दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन परिसरास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे. अशा मागणीचे निवेदन अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष शरदचंद्र पवार यांना मुंबई येथे देण्यात आले. डेमोक्रॅटिक पार्टीचे अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी हे निवेदन पवार यांना दिले. मराठी भाषेला दर्जा मिळवून देणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आहेत. त्यांच्या साहित्याचा योग्य गौरव दिल्लीच्या मराठी साहित्य संमेलनात करावा. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे एकमेव असे लेखक आहेत, ज्यांचे साहित्य देशातील विविध भाषेत प्रसिद्ध झालेले असून त्यांच्या साहित्यातून अनेक शब्दांची निर्मिती झाली आहे.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून उमटलेले प्रतिबिंब जगाला हेवा वाटावा असेच आहे. त्यामुळे दिल्ली येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन परिसराला साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे असे नाव देण्यात यावे. आशा मागणीचे निवेदन डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी शरद पवार यांना दिले. यावेळी पवार यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा संमेलनात योग्य तो सन्मान केला जाईल. आपल्या मागणीचे पत्र साहित्य मंडळाला वर्ग करून, त्यांना आदेशित करण्यात येईल. असा विश्वास शरदचंद्र पवार यांनी दिला. सदरील निवेदन देताना डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# केजमध्ये वाईन शॉपला ग्रामस्ताचा विरोध नियमा बाह्य ना हारकत प्रमाणपत्र रद्द करा- भाई मोहन गुंड

## नेम धाब्यावर ठेऊन ना हारकत देणा-या अधिका-यावर कारवाई करण्याची मागणी हारकत रद्द न केल्यास २६ जानेवारीला नगर पंचायतला टाळे ठोकणार नागरीक.

केज प्रतिनिधी केज मध्ये पुन्हा एकदा केस नगरपंचायतचा अंदाधुंदी कारभार चव्हाट्यावर आला आहे, ०२/१२/२०२४ वाल्मीक बाबुराव कराड यांच्या नावे वाईन शॉपसाठी केज शहरात नियमा बाह्य ना हारकत प्रमाणपत्र केज नगरपालिकेचे मुख्य अधिकारी सचिन देशपांडे यांनी वाईनशॉप साठी नियोजित जागेची रजिस्टरी झालेली नसताना त्या जागेवर एक दिवसा आधी ना हारकत प्रमाणपत्र दिले हि बाब नगरपांचयत मध्ये किती सावळा गोंधळ चालला आहे, या वरुन दिसून येते दिलेले ना हारकत रद्द करुन संबंधित अधिका-यांवर कारवाईची मागणी निवेदनाद्वारे भाई मोहन गुंड केली आहे. केज नगरपांचयत मध्ये सर्व लोकप्रतिनिधी



कार्यरत आहेत तरी कोनाच्या कानाला पत्ता नाही.

ना हारकत कधी दिले काय झाले हे गंभीर बाब आहे. स्थानिकचेच असलेले मुख्य अधिकारी सचिन देशपांडे यांनी ज्यांच्या नावाने ना हाकरत प्रमाणपत्र दिले त्यांचा थोडा तरी विचार गावच्या भल्यासाठी करण गरजेच होत कि वाल्मीक व्यक्ती हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे यावर अनेक केसेस आहेत, आशा व्यक्तीचा दारुचा व्यवसाय केजमध्ये सुरू झाला तर केज शहरामध्ये व्यसनाधिनता, चो-या, मारामारीचे प्रमाण वाढेल, परिणामी या पुर्वी एक वाईन शॉप होत तिथे दोन गटात मारामारी झाल्या होत्या सुदैवाने ते वाईनशॉप केज नाही, म्हणुन केज नगरपंचायतने वाईन शॉपला दिलेल ना हारकत सर्व नगरसेवकानी मिळुन ठरव घेऊन रद्द करून करावे. पदाचा गैरवापर करून ना हारकत देणार्या देशपांडे या अधिकार्यांची चौकशी करून कारवाई करण्यत यावी, पुढे होणारा अनर्थ टाळावा, अन्यथा केज वाशियांच्या वतीने २६ जानेवारी सकाळी ९ वाजता नगरपंचायतला टाळे ठोकण्यात येईल असा इशारा केज नगरपांचयत, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य. जिल्हा अधिकारी बीड. पोलीस अधीक्षक बीड. तहसिलदार केज. अन्न प्रशासन विभाग, पोलीस स्टेशन केज यांना दिलेल्या निवेदनात भाई मोहन गुंड, हनुमंत भोसले अरविद थोरात संदिप नाईकवाडे. अशोक रोडे, सुरज शेंडगे प्रशांत गुंड. विजय चाळक विशाल तपासे, वैभव चाळक राजेभाऊ गुंड, अक्षय तपासे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे,

# शक्तीपीठ महामार्गाचे काम सुरु करावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई,दि.१३-राज्यातील दळणवळण सुविधा तसेच व्यावसायिक संधी त्याचसोबत पर्यटनाला व्यापक प्रमाणात गती देणा-या शासनाच्या महत्वकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचे नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेने सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना आज येथे दिले. सह्याद्री अतिथिगृह येथे आगामी शंभर दिवसात सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी घेतला. त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, श्रीमती मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्यासह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, सचिव सदाशिव साळुंखे, सचिव ए.दशपुते, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापक अनिल गायकवाड यांच्या सह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी राज्यातील महामार्गाची उभारणी तसेच रस्त्यांचे जाळे दर्जेदार आणि अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने नियोजन करण्याचे सूचित करुन सांगितले की राज्यातील धार्मिक स्थळांना जोडणारा आणि पर्यटन उद्योग व्यवसायाला प्रोत्साहन देणारा शक्तीपीठ महामार्गाची उभारणी ही दर्जेदार आणि गतीमानतेने करावयची असून त्यासाठीच्या प्रक्रीया सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले. समृद्धी महामार्गाचे उर्वरित अंतिम टप्प्याचे आमणे पर्यंतचे ७६ कि.मी. लांबीचे काम तत्परतेने पूर्ण करुन फेब्रुवारी पर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा. तसेच यावर्षी समृद्धी महामार्गाचे कर्ज रोखे प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. प्रवाश्यांना उपयुक्त ठरणा-या मुबंई पुणे द्रुतगती मार्गावरील १३.३० कि.मी. मिसिंग लिंकचे काम ही गतीने पूर्णत्वास न्यावे. त्याचप्रमाणे नाशिक मुबंई या महत्वाच्या राष्ट्रीय महामार्गाचे सुधारणा करण्याचे काम ही तातडीने पूर्ण करावे. तसेच मंत्रालय परिसरात नविन सात मजली इमारतीची उभारणी कामाची सुरवात येत्या शंभर दिवसात करण्याचे सूचित केले. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कामांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी संबंधितांकडून योग्यरित्या पार पाडल्या जाणे आवश्यक असून त्याचे नियंत्रण करणारी यंत्रणा विभागाने कार्यान्वित करावी. विभागाच्या आर्थिक सक्षमतेसाठी नियोजन विभागाच्या निर्देशानुसार आर्थिक प्रारुप तयार करावे. त्याचप्रमाणे रस्त्यांच्या निर्मितीसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाने करुन रस्त्याचे काम बीओटी तत्वार करण्याचे धोरण स्विकारावे. विविध विभागांच्या बांधकामां संदर्भात केंद्रीय कार्यपद्धती अंमलात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी बांधकाम विभागातच संबंधित विभागांच्या बांधकामासाठीचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येईल. रस्त्यांच्या दुर्तफा वृक्ष लागवड करताना भविष्यातील रस्ता विस्तारी करणाची निकड लक्षात घेऊन वृक्षसंगोपन करणात यावे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन दर्जेदार आणि गतिमान कामे करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी संबंधितांना दिले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विभागामार्फत गुणवत्तापूर्ण आणि गतीमानतेने काम करण्यास प्राधान्य देण्यात येणार असून विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि कालमर्यादा प्रामुख्याने पाळण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच महामार्गावर प्रवाश्यांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध असण्यावर प्राधान्याने महिला प्रवाश्यांसाठी प्रसाधन गृहाची सुविधा उपलब्ध करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती म्हैसकर यांनी विभागाच्या आगामी शंभर दिवसांच्या नियोजनाबाबत माहिती देताना कार्यक्षमता, गुणवत्ता,पारदर्शकता याला प्राधान्य देत विभागाच्या माध्यमातून येत्या शंभर दिवसांत विविधांगी महत्व पूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात येणार असून विभागाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राबवण्यात येणा-या कामांची सविस्तर माहिती यावेळी दिली.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १४ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## कोळी ग्रामपंचायत येथे जिजाऊ जयंती



कृष्णा चौतमाल हदगांव - तालुक्यातील कोळी येथे राजमाता जिजाऊ माँ साहेब यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कोळी येथील ग्रामपंचायत कार्यालयात माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेचे गावकऱ्यांच्या हस्ते पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती. यावेळी कोळी गावचे उपसरपंच संतोष चौतमाल , पोलीस पाटील राजाराम कापडे , तंटामुक्ती अध्यक्ष देविदास चौतमाल , विशाल पाटील , मा. तंटामुक्ती अध्यक्ष गंगाधर चौतमाल , देवमाणे सर , पत्रकार संदीप सोनुले , सलीम शेख , सुभाष हाटकर , धनंजय क्षीरसागर , गणेश क्षीरसागर , विष्णू जगताप व संतोष काळे उपस्थित होत

# शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी विक्रम पवार



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : किनवट येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी विक्रम पाटील पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. किनवट सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची बैठक सोमवारी दि.१३- जानेवारी रोजी गोकुंदा येथील शासकीय विश्राम गृहात संपन्न झाली.यावेळी बैठकीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारिणी निवडण्यात आली.यात सर्वानुमते शिवजयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी- विक्रम पवार कार्याध्यक्ष बबनराव वानखेडे उपाध्यक्ष ओम काकडे,पांडुरंग बादड,अरविंद कदम,आदित्य कदम, कोषाध्यक्ष निरंजन मिराशे यांची निवड करण्यात आली.

यावेळी प्रा.रामप्रसाद तौर,वैजनाथ करपुडे पाटील,अनिल पाटील क-हाळे, जेष्ठ पत्रकार फुलाजी गरड पाटील मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा.दगडू भरकड संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील कदम यांच्यासह समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते शिवप्रेमी बांधव उपस्थित होते.

# संतोष देशमुख यांच्या अपहरणाच्या २४ तास आधी नेमकं काय घडलं होतं?

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली. या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली आहे. वातावरण चांगलंच तापलं आहे. याप्रकरणात संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनी मोठा खुलासा केला आहे. संतोष देशमुख यांचं अपहरण होण्यापूर्वीचा संपूर्ण घटनाक्रम त्यांनी सांगितला आहे.

नेमकं काय म्हणाल्या अश्विनी देशमुख? मला जास्त काही माहिती नाही, ते फक्त एवढेच बोलले थोडी किरकिरी झाली, त्यांना भीती वाटते. ते टेन्शनमध्ये होते मी त्यांना विचारलं काय झालं काय नाही,



त्यांनी सांगितलं थोडे भांडण झाले आहेत. ते लोक जरा गुंड प्रवृत्तीचे आहेत, मला भीती वाटते असं त्यांनी मला सांगितलं. त्यांना भीती वाटत होती ते दोन दिवस सारखं टेन्शनमध्ये होते. त्यांना सारखे फोन येत होते, पण मी काय एवढं लक्ष दिलं नाही, पण त्यांना फोन येत होते. फोनवर काय बोलणं सुरू होतं ते काय मी ऐकलं नाही. ९ तारखेला ते लातूरहून म स्साजोगला आले होते, त्यांना सोमवारचा उपवास असतो म्हणून मी त्यांना सोमवार सोडल्याशिवाय जाऊ नका म्हटलं, त्या दिवशी जाऊ नका म्हटले होते. त्यानंतर ते घरी थांबले थोडी उसळ खाल्ली त्यानंतर ते झोपले. पण त्यांना सारखे फोन येत होते, त्यामुळे ते साडेअकरा बाराच्या सुमारास गावाकडे आले. ते थांबले नाहीत त्यांना कुणाचे फोन येत होते म्हणून ते आले, आणि ही घटना घडली, असं अश्विनी देशमुख यांनी म्हटलं आहे. दरम्यान आरोपींना लवकरात लवकर पकडावं, त्यांना शिक्षा करावी. फरार असलेला एक आरोपी पकडण्यासाठी इतका का वेळ लागत आहे? लवकरात लवकर आरोपींना पकडा आणि त्यांना कठोर शिक्षा द्या, अशी मागणी देखील यावेळी अश्विनी देशमुख यांनी केली आहे. दरम्यान आता वातावरण चांगलंच तापलं असून, वाल्मिक कराड याच्यावर मोक्का लावण्यासाठी आज मस्साजोगमध्ये ग्रामस्थांनी टाकीवर चढून आंदोलन केलं. या आंदोलनात संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख देखील सहभागी झाले होते.

## राष्ट्रीय पोस्टर आणि प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास प्रथम क्रमांक




माजलगाव प्रतिनिधी दिनांक ११/०१/२०२५ येथील भा. शि. प्र. संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयात संपन्न झालेल्या राष्ट्रीय पोस्टर आणि प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मि ळाले. यासाठी रसायनशास्त्र विभागाची कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन बी.एस्सी. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनीने हा प्रकल्प सादर केला. जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकाने निवड होवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे मइलेक्ट्रिक वाहनासाठी वायरलेस चार्जिंग रोडफ हा प्रकल्प प्रा.अक्षय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ती उत्तम पद्धतीने सादर करणार आहे संशोधन क्षेत्रातील नावीन्यामुळे कु. मोहिनी हिने सर्वात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई येथे झालेल्या स्पर्धेत पटकाविले आहे.या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला विभाग प्रमुख डॉ. विकास बोरगावकर, डॉ. संजय पवार यांनी योग्य दिशा दाखवत संशोधन वृत्ती विकसित केली आहे. प्रा. अक्षय जगताप आणि कु मोहिनी पायघन या दोघांचेही अभिनंदन भा. शि. प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष जितेश चापसी, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य तथा संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, स्थानिक पदाधिकारी सुरेंद्र रेदासनी, ॲड. विश्वास जोशी, अभय कोकड, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे,कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी यांचेसह सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## ओंकार सार्वजनिक वाचनालय खांडे पारगाव या ठिकाणी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी,



बीड तालुक्यातील ओंकार सार्वजनिक वाचनालय खांडे पारगाव या ठिकाणी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व ,स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली, यावेळी सर्वप्रथम प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, यावेळी उपस्थित,त्रिंबक आमटे,अविनाश आम टे,युवा पत्रकार अंकुश गवळी,विजय आमटे,धीरज कदम,शिवराज आमटे,अजय आमटे,रितेश कदम,गजानन वाघमारे,समर्थ आमटे,दादा वाघमारे,अहेफाज सय्यद,तुकाराम आमटे आदी सह सर्व वाचक उपस्थित होते

## मुख्यमंत्र्यांना भेटूनही एसआयटीचे अधिकारी तेच

संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांना पोलीस प्रशासनावर भरवसा राहिलेला नाही. त्यांनी एसआटीमध्ये खंडणीतील आरोपींच्या मनावर अधिकारी नियुक्त केल्याचे त्यांना वाटत असावे, यामुळे एसआयटीतील अधिकारी बदलावेत, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे भेटून केली होती. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी आपण द्याल ती नावाचे अधिकारी देतो, असे म्हटले होते. परंतु अद्याप ते अधिकारी बदलले नाहीत, असेही खा.सोनवणे यांनी म्हटले.

## त्यांची नावे जाहिर करा

खंडणी आणि खून हे प्रकरण एकमेकांशी संबधित आहेत. या प्रकरणात खंडणीतील आरोपींशी ज्यांचे संबंध आहेत, अशा अनेकांना एसआयटीने चौकशीसाठी बोलविले होते. त्या सर्वांची नावे जाहिर करण्यात यावीत. त्या लोकांचे आरोपींशी काय संबंध आहेत, हे लोकांना कळले पाहिजे. याच बरोबर खून आणि खंडणीतील आरोपींना ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांना सहआरोपी करावे, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

# १२ डिसेंबरला माजी पालकमंत्र्याच्या बंगल्यावर आरोपी अन पोलीस अधिका-याची बैठक

## खा.बजरंग सोनवणेंचा खळबळजनक आरोप

बीड: ९ डिसेंबरला सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली. यानंतर ११ तारखेला या हत्येशी संबधित असलेल्या खंडणीप्रकरणी गुन्हा दाखल झाला. यानंतर दि.१२ डिसेंबर रोजी माजी पालकमंत्री यांच्या बंगल्यावर खंडणीतील आरोपी आणि पोलीस अधिका-यांची बैठक झाली आणि तिथून आरोपी निघून गेला, असा खळबळजनक आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. या आरोपाने पोलीस प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. दि.१३ डिसेंबर रोजी केज येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या पत्रकार परिषदेचे अयोजन करण्यात आले होते. त्याआधी खा.सोनवणे यांनी मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटूंबियांच्या आंदोलनात भेट दिली होती. पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे नेते राजेसाहेब देशमुख, पिंटू ठोंबरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, दि.२८ मे रोजी खंडणीच्या प्रकरणाला सुरूवात



झाली. यानंतर २९ नोव्हेंबरला पुन्हा खंडणी मागितली. पुढे दि.६ डिसेंबर रोजी खंडणीवरून अवादा कंपनीच्या परिसरात वाद झाला. याच वादाचा राग मनात धरून दि.९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांचा निघृर्न खून करण्यात आला. यानंतर दि.११ डिसेंबर रोजी खंडणीच्या प्रकरणात वाल्मिक कराडवर गुन्हा दाखल होतो. पुढे दि.१२ डिसेंबर रोजी हाच आरोपी माजी पालकमंत्र्यांच्या बंगल्यावर पोलीस अधिका-्यांसोबत बैठक करतो आणि तिथून निघून जातो. इतकी दहशत पोलीस प्रशासनावर होती. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडानंतर मी पहिल्याच बाईटमध्ये मीडियाला म्हटलं होतं की, तिस-्या आरोपींचे कनेक्शन धाराशिवमार्गे पुण्याला लागतंय का बघा?, कारण माझ्या बोलण्यामागे काही लॉजिक होतं. पुढे हा आरोपी धाराशिवमार्गे पुण्याला गेल्याचं सापडलं. खंडणीतील आरोपी पुण्याला सरेंडर होतो. खंडणीच्या आरोपीवर ११ तारखेला गुन्हा दाखल झाला. मात्र, १२ तारखेला बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, खंडणीतील आरोपी आणि पोलीस अधिकारी यांची बैठक झाली. माजी पालकमंत्र्यांच्या बंगल्यावर, त्यांच्या ऑफिसमध्ये खंडणीतील आरोपी अनब पोलीस अधिकारी यांची भेट झाली. हे खात्रीने सांगत आहे. म्हणजे, पोलिसाला तिथं मध्ये बसवून तो आरोपी निघून गेला का? असा सवाल बजरंग सोनवणेंनी उपस्थित केला. याच बरोबर वाल्मिक कराडला पोलिसांची सुरक्षा आहे, तो कुठल्या पदावर आहे हे मला माहिती नाही. पण, त्यांनाही पोलीस गार्ड आहेत, हे गार्ड आरोपीसोबत कसे काय?, असे सवाल बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला आहे. ११ डिसेंबर रोजी खंडणीचा गुन्हा दाखल झाला, तेव्हापासून आरोपीला कोणी-कोणी मदत केली. ३१ डिसेंबरला अटक होईपर्यंत २१ दिवस आरोपीला ज्यांनी मदत केली, त्यांना सह-आरोपी का केलं जात नाही, असेही खा.सोनवणेंनी म्हटलं आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com